# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

# इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज,वर्धा

**वर्ग : बी.ए. तीसरे सत्र**

**विषय : मराठी साहित्य**

## प्रश्नपित्रका

---

**प्रश्न १ ला** 'कविता' या वाङ्मयप्रकाराची संकल्पना सांगून कविता वाङ्मयप्रकाराचे विविध घटक आणि वैशिष्ट्ये सविस्तरपणे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. **१६**

**किंवा**

कवी इंद्रजित भालेराव यांच्या अभ्यासक्रमाला नेमलेल्या कवितांच्या आधारे त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्रश्न २ रा** अर्वाचीन मराठी कवितेचा उगम सांगून तिच्या विकासाचे टप्पे स्पष्ट करा. **१६**

**किंवा**

कवयित्री प्रभा गणोरकर यांच्या कवितेतील आशयसौंदर्य तुमच्या शब्दांत उलगडून दाखवा.

**प्रश्न ३ रा** खालील कोणत्याही एका गटातील काव्यपंक्तीचे संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. **१६**

**गट 'अ'**

१. ''माझीया गीतात वेडे
दु:ख संतांचे भिनावे
वाळल्या वेलीस माझ्या
अमृताचे फूल यावे''

२. ''नरकाची हिरवट काळी झाक असलेलं हें शहर
मला निवडून दिलं गेलंय
आणि मी तें स्वीकारलंय बंद ओठांनी
ललाट रेषेसारखं''

३. ''काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते
तिफन चालते...''

४. ''तिला नको काही, तिचा लहानसा जीव
मायेपोटी शब्द तिथे थांबला गे बाये
जनाईच्या निरंजन मनामध्ये विठू
दिवा तसा तुळशीशी लावलेला आहे.''

**किंवा**

१. ''दाट ढगांच्या छाया
झिम्मा खेळुन जाय.
घाट. निसरडी वाट

नदीचा झुलता काठ''

२. ''ती गेली तेव्हा रिमझिम
पाऊस निनादत होता
मेघात मिसळली किरणे
हा सूर्य सोडवित होता''

३. ''दुनियेत चंद्रसूर्याच्या,
मज कुणिच घेतले नाही
या जन्माची कधी माझ्या
कुणी आई झाले नाही.''

४. ''चिद्रूप झाले विद्रूप
सत्य विपर्यास
अंतरीचा भोळा भाव
कोठे विसरलास?''

**प्रश्न ४ था** खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **१६**

**गट 'अ'**

१. काव्यसौंदर्य म्हणजे काय? हे सांगून काव्यलक्षणाची चर्चा करा.

२. काव्य तत्वाविषयी सांगितलेल्या उपपत्तीची चर्चा करा.

३. मम्मटाच्या मते कोणते काव्यप्रयोजन श्रेष्ठ आहे? स्पष्ट करा.

४. कला आणि नीती यांच्या परस्परसंबंधात वाद उत्पन्न होतो काय? ते सांगून त्या वादाची योग्ययोग्यता स्पष्ट करा.

**किंवा**

१. संस्कृत काव्यातील प्रमुख ग्रंथकारांची त्यांच्या वैशिष्ट्यासह संक्षेपात माहिती लिहा.
२. काव्य म्हणजे काय? संकल्पना स्पष्ट करा
३. मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजने कोणती?
४. 'जिज्ञासापूर्ती' हे काव्यप्रयोजन कसे ठरते ते सांगा.

**प्रश्न ५ वा** खालील प्रश्नांची उत्तरे संक्षिप्तपणे लिहा. **१६**

१. कवी इंद्रजित भालेराव यांचे काव्यविश्व रसिकांसमोर कशाप्रकारे उभे राहते?
२. 'विवर्त' या कवितेतून कोणती जाणीव अभिव्यक्त करतात?
३. 'मंत्राक्षरे' या कवितेतून कशाचे वर्णन आले आहे?
४. कापूस फुललेला पाहून कवी विठ्ठल वाघ काय म्हणतात?
५. 'काव्यदर्श' या ग्रंथाबाबत थोडक्यात माहिती लिहा.
६. ललित वाङ्मयाचे कोणते वैशिष्ट्ये सांगता येईल?
७. 'आल्हाद' हे प्रयोजन कशाप्रकारचे आहे?
८. वाङ्मयाचे मुख्य प्रयोजन कोणते?